जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरूर या तालुक्यांतील २३३ अतिसंवेदन शिलगावे 'संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' घोषित

पुणे / प्रतिनिधी

जुन्नर वन विभागातील मागील ५ वर्षातील बिबट वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य जखमी व मृत्यूच्या घडलेल्या घटना लक्षात घेता जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५च्या कलम (३०) (२) (ळळळ) व (ळीं) अन्वयेजुन्नर, आंबेगाव, शिरूर, खेड तालुक्यातील २३३ अतिसंवेदनशिल गावांना 'संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' म्हणून घोषित केले आहे.

जिल्ह्यातील उत्तरेकडील जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरुर या चार तालुक्यांचा जुन्नर वन विभागामध्ये समावेश असूनया वन विभागाचे क्षेत्र व्यवस्थापनाच्या दृष्टीने अनुक्रमे जुन्नर, ओतूर, मंचर, बोडेगाव, खेड, चाकण व शिरुर या सात वन परिक्षेत्रामध्ये विभागलेले आहे. जुन्नर वन विभागाचे बहुतांश क्षेत्र डोंगराळ असून या मध्ये पाटबंधारे विभागाचे सिंचन प्रकल्प आहेत. यात प्रामुख्याने घोडव कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभे, माणिकडोह, पिपळगांव जोगे, बडन, चिल्हेवाडी, चासकमान असे मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प असल्याने सिंचन सुविधेत वाढ झालेली आहे.

पाण्याच्या उपलब्धतेमुळे ऊस, केळी, द्राक्ष, डाळींब अशी दिर्घकालीन बागायती पिके या भागात मोठ्या प्रमाणात होतात. या दिर्घकालीन पिकांमध्ये बिबट्यांना लपण्यासाठी उत्तम निवारा आणि पाण्याची मुबलक उपलब्धता असते. तसेच शेती व्यवसायामुळे मानवाची पाळी व प्राण्यांसह शेतातील रहिवासांमध्ये वाढ झाली आहे. यामुळेपाळी व प्राणी भक्ष्य म्हणून सहज उपलब्ध होत असल्याने बिबट या वन्य प्राण्यांचा अधिवास अशा बागायती क्षेत्रातच निर्माण झालेला आहे. बिबट्यांचे वास्तव्य हे प्रामुख्याने ऊस शेतीत आहे. या प्रकरणी गेल्या २३ वर्षा पासून या वन विभागात मान व बिबट संघर्षामध्ये वाढ होत आहे.

भारतीय वन्यजीव संस्थान, डेहराडुन या संस्थेमार्फत जुन्नर वन विभागाच्या हद्दीत करण्यात आलेल्या अभ्यासा अंतीया क्षेत्रात बिबट वन्य प्राण्याच्या संख्येची घनता प्रति १०० चौ.कि.मी. मध्ये ६ ते ७ बिबटे इतकी आढळून आली आहे. तसेच बिबट्यांचे मानवावरील, पशुधनावरील हल्ले पाहता जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरुर या तालुक्यांमध्ये बिबट्यांची एकुण संख्या अंदाजे ४०० ते ४५० असण्याची शक्यता आहे. जुन्नर वन विभागात मागील ५ वर्षात बिबट वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात एकूण ४० गंभीर जखमी व १६ मृत्युच्या घटना घडलेल्या आहेत.

या क्षेत्रात बिबट्याचा मानवावरील हल्ला होण्याच्या घटनेत वाढ झाली असून सदरचे क्षेत्र हे मानव-बिबट संघर्षाचे आपत्ती क्षेत्र झालेले आहे. बिबट वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी व मृत्युच्या घटनेची व्याप्ती लक्षात घेता सदर क्षेत्र संभाव्य बिबट आपत्ती प्रवण क्षेत्र' घोषीत करण्यात आल्याचे आदेशात नमूदकरण्यात आले आहे.

थोडक्यात

पक्ष्या अनुज्ञप्तीसाठी शिबीर दौऱ्याचे आयोजन

पुणे : पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून जुलै महिन्यात पक्ष्या अनुज्ञप्तीसाठी शिबीर दौऱ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी कळविले आहे. पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत खेड येथे १ व २ जुलै, मंचर येथे ८ व ९ जुलै, जुन्नर येथे १५ व १६ जुलै, वडगाव मावळ येथे २२ व २३ जुलै तर लोणावळा येथे २९ व ३० जुलै या दिवशी पक्की अनुज्ञप्ती शिबीर दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पक्ष्या अनुज्ञप्ती चाकोटा २८ जून रोजी सायंकाळी ५ वाजता उपलब्ध होणार असल्याचेही प्रादेशिक परिवहन अधिकारीयांनी कळविले आहे.

जिल्हास्तरीय लोकशाही दिन १ जुलै रोजी

पुणे : जिल्हास्तरावरील लोकशाही दिनाचे सोमवार १ जुलै २०२४ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील ५ व्या मजल्यावरील बैठक सभागृहात आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी दिली

दौंड तालुक्यातील बिरोबावाडीत हिट अँड रन चा प्रकार

दौंड / प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील पाटस -दौंड अष्टविनायक महामार्गावर बिरोबा वाडी येथे दुसरीत शिकणाऱ्या लहान बालकाला चार चाकी पिकअप ने धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे..यामुळे परिसरातील वातावरण तापले असल्याने नागरिकांनी रस्ता बंद केला आहे..रस्त्यावर वाहतुकीच्या लांब रांगा लागल्या आहेत .

अपघातात जागीच मयत झालेल्या आयुश राजेश यादव (वय-८ वर्षे) असे या शाळकरी विद्यार्थ्यांचे नाव आहे..ही घटना बिरोबावाडी येथील अष्टविकानाय रस्त्यावरील मुख्य चौकात घडली आहे याचं चौकात जिल्हापरिषद शाळा आहे त्याची आई आपल्या मुलीला व मुलाला शाळेत सोडण्यासाठी जात असताना पाटस वरून दौंड दिशेने वेगात जाणाऱ्या पिकअपने रस्ता क्रॉस करत आता विद्यार्थ्याला जोराची धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे..

शाळेच्या चौकात अष्टविनायक महामार्गावर गतिरोध करण्याची मागणी यावेळी संतप्त झाले नागरिक करत आहे यामुळे त्यांनी दौंड पाटस अष्टविकानाय रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवला आहे.. यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांब रांगा लागल्या आहेत..

या घटनेची माहिती मिळताच यवत पोलीस निरीक्षक नारायण देशमुख घटनास्थळी दाखल झाले असून नागरिकांना शांत करण्यासाठी यवत पाटस पोलिस पर्यंत करीत आहे.

पालखीतळ व रस्त्याची प्रशासनाकडून पाहणी वारकऱ्यासाठी विशेष सुविधांचे नियोजन !

सासवड : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषाढी पायवारी पालखी सोहळा २९ जून ते मंगळवार दिनांक १६ जुलै या कालावधीत असून ,जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पुरंदर तालुक्यातून जाणाऱ्या पुणे सासवड जेजुरी निरा या पालखी मार्गाला व पालखीतळ विसाव्यांच्या ठिकाणांना भेटी देऊन तेथील तयारीचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग अनुराधा भंडारे, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, गटविकास अधिकारी डॉ. अमिता पवार, सासवड नगरपालिका मुख्याधिकारी डॉ.कैलास चव्हाण, पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विक्रम काळे, नगरपरिषद आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभागाचे अधिकारी, राहुल टकले , संतोष गिरमे, संभाजी जगताप, पत्रकार, सासवड नगरपरिषद, पोलीस स्टेशन, तहसील ऑफिस, प्रांत ऑफिस, कर्मचारी वृद्ध आदी उपस्थित होते .

शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडाप्रबोधिनी मध्ये २०२४-२५ साठी प्रवेश प्रक्रीया सुरू

पुणे / **प्रतिनिधी**

महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करुन त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार आणि अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत असलेल्या ९ क्रीडाप्रबोधिनीत सरळप्रवेश (५० टक्के) व कौशल्य चाचणी (५० टक्के) प्रक्रियेअंतर्गत निवासी व अनिवासी प्रवेश देण्यात येणार आहेत.

राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, औरंगाबाद,गडचिरोली अशा ९ ठिकाणच्या क्रीडा प्रबोधिनीमध्ये क्रीडा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येणार आहे. ज्यूदो, जिम्नॅस्टीक्स, हॉकी, शुटींग, फुटबॉल, जलतरण, थलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हॅन्डबॉल, टेबलटेनिस, वेटलिफ्टींग, ट्रायथलॉन, सायकलिंग आणि बॉक्सींग अशा १७ क्रीडाप्रकारात प्रशिक्षण देण्यात येईल.

सरळ प्रवेश प्रक्रियेसाठी क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले १९ वर्षाआतील खेळाडूंची तज्ज्ञ समितीसमोर संबंधित खेळाबाबतची चाचणी घेवून प्रवेश निश्चित केला जातो.

खेळनिहाय कौशल्य चाचणी प्रक्रीयेअंतगर्त क्रीडा प्रबोधिनीत असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी १९ वर्षाआतील खेळाडूंसाठी संबंधित खेळाच्या कौशल्य चाचणीचे आयोजन करुन गुणानुक्रमे प्रवेश दिला जातो. क्रीडा चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकाद्वारे चाचणी घेवून क्रीडा प्रबोधिनीमध्ये शारीरिकदृष्टया सुदृढ खेळाडूंची निवड अंतिम करण्यात येते.

पात्र खेळाडूंनी ५ जुलै २०२४ रोजी पूर्वी आपला प्रवेश विनंती अर्ज आवश्यक प्रमाणपत्र जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी पुणे यांचेकडे द्यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; कारवाईची मागणी

वाघोली : राजपूत (भा) समाजा विषयी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या लक्ष्मण हाके यांच्यावर शासनाने तात्काळ कारवाई अशी मागणी राजपूत (भा) समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांसह गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

ग्रामपंचायत मुखई, ता. शिरूर, जि. पुणे
१ खुली निविदा सूचना क्र. १ सन २०२४-२५

सरपंच, ग्रामपंचायत मुखई, ता. शिरूर, जि.पुणे यांचे वतीने तर्फे जि. प. पुणे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील सीलबंद निविदा मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत मुखाई, ता. शिरूर जि . पुणे यांच्याकडून दि. २९-०६- २०२४ ते दि.०४-०७-२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व भरून पाठविलेले मोहरबंद निविदा दि. २९-०६-२०२४ ते दि.०४- ०७-२०२४ पर्यंत दु. ०५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत मुखई, ता. शिरूर येथे स्वीकारण्यात येतील. मोहरबंद निविदा दि.०६-०७-२०२४ रोजी दु. ०२.०० नंतर उघडण्यात येतील.

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम रु.	निविदा फी रु.	ठेकेदार वर्गीकरण	कामाचा कालावधी
१.	मौजे मुखई येथील इंदिरानगर मुरुमी करण करणे, ता. शिरूर (१५% ग्रामनिधी)	१,९७,९२६/-	२३६/-	सुबे अभियंता	६ महिने

१. कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. **२.** कोऱ्या निविदा नमुन्याची फी ग्रामपंचायत मुखई, ता. शिरूर येथे भरून निविदा उपलब्ध होतील. **३.** ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित नोंदणी दाखला सादर करणे आवश्यक आहे. **४.** सर्व साधारण खुल्या वर्गातील निविदेकारिता कोऱ्या निविदा रक्कमेच्या १% इसारा रक्कम कोणत्याही बँकेचा डी. डी ग्रामपंचायत मुखई या नावे असलेला लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय आर्थिक लिफाफा उघडला जाणार नाही. **५.** कोऱ्या निविदांच्या तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाची कागदपत्रे १. निविदा फी पावती, २. नोंदणी प्रमाणपत्र, ३. प्राप्तीकर प्रमाणपत्र, ४. वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत मुखई ता. शिरूर, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत मुखई ता. शिरूर, जि. पुणे

पुणे महानगरपालिका
भवन रचना विभाग
निविदा प्रक्रिया कक्ष
निविदा जाहिरात-नविन कामे

१) ई-निविदा विक्री कालावधी :- २८/०६/२०२४ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते ०८/०७/२०२४ दुपारी २.३० वाजेपर्यंत..
२) निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ :- २८/०६/२०२४ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते ०८/०७/२०२४ दुपारी २.३० वाजेपर्यंत..
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक :- ०९/०७/२०२४ दुपारी ३.०० वा. वाजेनंतर

निविदा क्र.	खात्याचे नाव	कामाचे नाव	एकूण निविदा रक्कम	बयाणा रक्कम	कामाची मुदत	निविदा संच रूपये	निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्र.
पी.एम.सी भवन/६८ २०२४-२५	भवन रचना विभाग	पुणे मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट गावातील शाळा मध्ये fire extinguisher विषयक कामे करणे.	१६९४२८०/-	१६९४३/-	४ महिने (पावसाळी कालावधीसह)	१३५९/-	श्री. प्रतिक पाथरकर ९८२२९५२४२१
पी.एम.सी भवन/६९ २०२४-२५	भवन रचना विभाग	पुणे मनपा जुन्या हद्दीतील शाळा मध्ये fire extinguisher विषयक कामे करणे.	२११७६५४/-	२११७७/-	४ महिने (पावसाळी कालावधीसह)	१३५९/-	श्री. प्रतिक पाथरकर ९८२२९५२४२१

अ) पुणे मनपा ची वरील कामे ही अनुभवी/मनपा मान्यता प्राप्त/शासन मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत. **ब)** सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदा संचाचीविक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत. **क)** निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील. **ड)** ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती भवन विभाग पुणेमनपा येथे मिळेल. **इ)** कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/ ३२, दि. २२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
भवन रचना कार्यालय
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र.१/७७ दि.२७/०६/२४

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: पुणे

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 26.06.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. रश्मी सुहास वाघमारे 2. सुहास विष्णू वाघमारे	मालमत्तेच्या पत्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: संपत्तीचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: – "एक्झर्बिया ॲबोद" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील 22.49 चौरस मीटर चटई क्षेत्रफळाचे मोजमाप करणारा फ्लॅट क्रमांक A1-201 संलग्न बाल्कनी क्षेत्रासह 0.00 चौ.मी. अधिक अतिरिक्त एकत्रित बाल्कनी क्षेत्र 0.00 चौ.मी. मीटर आणि एकत्रितपणे खुल्या टेरेसच्या वापरासाठी विशेष अधिकार, गेट क्रमांक 24 गाव जांभूळ, तालुका मावळ, पुणे, महाराष्ट्र 410506 येथे स्थित	H172022302191236 54 & H172022302191236 54L & H166372901190114 37 & H166372901190114 37L	13 जून 2024	रु. 1,25,452	रु. 30,68,976.55	रु. 12,54,520	सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून	01-08-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30
1. रश्मी सुहास वाघमारे 2. सुहास विष्णू वाघमारे	मालमत्तेच्या पत्याचे सर्व तुकडा आणि पार्सल: संपत्तीचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: – "एक्झर्बिया ॲबोद" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील 22.67 चौरस मीटर चटई क्षेत्रफळाचे मोजमाप करणारा फ्लॅट क्रमांक A1-202 संलग्न बाल्कनी क्षेत्रासह 0.00 चौ.मी. अधिक अतिरिक्त एकत्रित बाल्कनी क्षेत्र 0.00 चौ.मी. मीटर आणि एकत्रितपणे खुल्या टेरेसच्या वापरासाठी विशेष अधिकार, गेट क्रमांक 24 गाव जांभूळ, तालुका मावळ, पुणे, महाराष्ट्र 410506 येथे स्थित	H172022302191236 54 & H172022302191236 54L & H166372901190114 37 & H166372901190114 37L	13 जून 2024	रु. 1,26,400	रु. 30,68,976.55	रु. 12,64,000	सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून	01-08-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30
1. प्रिती आशिष सिंग 2. आशिष तारा प्रसाद कुमार	संपत्तीचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: – निवासी फ्लॅट क्रमांक 906, 26.99 चौ. मीटर (चटई क्षेत्र) एक्झर्बिया आयफेल सिटी C5 म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या नवव्या मजल्यावर 4.74 चौ.मी. गट क्रमांक 1527/2, 1447, 1448, 1450/1, 1526, 1450/2, 1451,1438, 1467, 1467, 1470, 1474, 1440, 1468, 1565, 1466, 1545, 1449, 1550, 1527/1, 1527/3, 1479, 1445, 1464, 1441, 1549, 1540, 1469, 1463, 1462, 1537, 1454, 1535, 1534, 1446, 1477, 1443, 1458, 1455, 1461, 1478, आणि 1525 आणि इतर गाव – चाकण तालुका – खेड जिल्हा पुणे महाराष्ट्र 410501	PUNHL18001753 & PUNHL18001171	13 जून 2024	रु. 1,46,940	रु. 26,76,628.93	रु. 14,69,400	सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून	01-08-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30
1. मोहम्मद मकबुल आला शेख 2. आफरीन मोहम्मद मक शेख	संपत्तीचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: – फ्लॅट क्रमांक A5-216, संलग्न बाल्कनीसह 25.59 चौ.मी. चटई क्षेत्र मोजमाप 4.43 चौ.मी. एकूण क्षेत्रफळ 30.02 चौ.मी. "एक्झर्बिया अंबी", म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर मावळ गाव, जिल्हा पुणे, महाराष्ट्र भारत – 410507	H166222406190413 07 & H166222406190413 07L	13 जून 2024	रु. 1,69,360	रु. 27,29,960.35	रु. 16,93,600	सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून	01-08-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30
1. भाग्यश्री बराटे 2. संदीप बराटे	संपत्तीचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: – फ्लॅट क्रमांक A5-213, संलग्न बाल्कनीसह 25.59 चौ.मी. चटई क्षेत्र मोजमाप 4.43 चौ.मी. एकूण क्षेत्रफळ 30.02 चौ.मी. "एक्झर्बिया अंबी", म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावर मावळ गाव, जिल्हा पुणे, महाराष्ट्र भारत – 410507	H005352806201006 48/ H005352806201006 48L/ H005352806201006 48G	13 जून 2024	रु. 1,37,460	रु. 28,81,527.09	रु. 13,74,600	सर्व कामकाजाच्या दिवशी भेटीची वेळ निश्चित करून	01-08-2024 सकाळी 10 ते संध्याकाळी 5:30

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना 31/07/2024 रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे 01/08/2024 रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे 02/08/2024 भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेची तपासणी करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात उदा., **नाव – शेखर काळे, एल&टी फायनान्स लिमिटेड, संपर्क क्रमांक 9823271111- आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं.177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरूमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई – 400 098** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी स्वीकार/नाकारू/सुधारू/रद्द करू शकतात. कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता ई-लिलाव बोली/ऑफर किंवा पुढे ढकलू शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 29.06.2024
ठिकाण: पुणे

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. * व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com